# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, 02230233410/443 फॅक्स - 22692102.
E-mail : dtedesk२@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१५/ १३४
दिनांक : 2 FEB 2015

## सन २०१५-१६ च्या मान्यता प्रक्रीयेसाठी जाहीर सूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता अॅप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१५-१६ मधील मार्गदर्शक सूचनांच्या आधारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज दि. २०.०२.२०१५ पर्यंत मागविण्यात आलेले आहेत. परिषदेस सादर केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in/courseapproval2015/ ही लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. विद्यमान संस्थानी त्यांचा डिटीई संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉग इन करुन दि. ०६/०२/२०१५ पासून दि. २१.०२.२०१५ पर्यंत अर्जाची माहिती भरुन संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द होणा-या सुनावणीच्या विहित केलेल्या दिनांकास आवश्यक कागदपत्रांसह व्यक्तीश: उपस्थित रहावे. तसेच परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालयाकडे जमा करण्यात यावी.

नविन तंत्र शिक्षण संस्था सुरू करणे, संस्थेचे स्थलांतरण, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थांनी परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थानी दि. २१/ ०२/२०१५ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह संबधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेशी संपर्क साधावा.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत शासनाने बृहत् आराखडा [Perspective Plan] तयार केला असून तो संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध असून परिषदेस प्रस्ताव सादर करतांना बृहत् आराखडयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता उपलब्ध प्रवेशक्षमता विचारात घेण्यात यावी.

587 04/02/2015

(डॉ. सुभाष महाजन )
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती
जा.क्र. विकाअ/शिक्षण/मान्यता/२०१५/ 290
दिनांक 05/02/2015

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

प्रत :- १) प्राचार्य, सर्व पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या संस्था यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.
३) सूचना फलकावर लावण्याकरीता.